# ७. गृह सजावट

७.१ कलेच्या घटकांची ओळख

७.२ डिझाइनच्या तत्त्वांची ओळख

**चर्चा करू या : गृह सजावट आणि घराचे डिझाइन**


प्रत्येक व्यक्तीची अशी इच्छा असते की त्याचे किंवा तिचे घर सुंदर रीतीने सजवलेले असावे. प्रत्येकाने हे समजून घेणे आवश्यक आहे की घर केवळ सुंदर रीतीने सजवलेले नसावे परंतु ते आनंददायी आणि आकर्षक असावे. घरामध्ये स्वागतार्ह वातावरण तयार झाले पाहिजे जेणे करून पाहुण्यांना आरामदायक वाटेल. कुटुंबातील सदस्यांना खूप जास्त काळ घराबाहेर काम करून आल्यानंतर आरामदायी वाटेल. म्हणूनच घर केवळ सजवलेले नसावे तर त्याचे डिझाइन चांगले असावे. डिझाइन म्हणजे रूप, अवकाश, रंग, पॅटर्न आणि पोत यांची सौंदर्य आणि व्यक्तिमत्त्व परत्वे निर्मिती आणि संयोजन.

सध्याच्या शहरी भागांमधील जागेची कमतरता आणि सातत्याने वाढणाऱ्या घरांच्या किमती विचारात घेता उपलब्ध जागेची उपयुक्तता आणि आर्थिक बाजू हे दोन घटक घराच्या डिझाइनिंगमध्ये महत्त्वाचे ठरतात.

घरासाठी चांगले डिझाइन तयार करण्यासाठी कुटुंब, व्यावसायिक इंटिरीअर डिझाईनरची मदत घेऊ शकते. परंतु हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की प्रत्येक व्यक्तीमध्ये नैसर्गिकपणे सौंदर्य ओळखण्याची क्षमता असते, जिचा उपयोग करून व्यक्ती घरामधील वातावरणामध्ये सौंदर्याची निर्मिती करू शकते. कलेचे घटक आणि डिझाइनची तत्त्वे यांचे ज्ञान व्यक्तीला आवश्यक ते मार्गदर्शन पुरवते आणि या ज्ञानाचे घराच्या डिझाइनिंगमध्ये उपयोजन करणे, घरामध्ये जिवंतपणा आणणे आणि प्रसन्न वातावरण निर्माण करणे यासाठी निश्चितच उपयोग होईल.

## ७.१ कलेच्या घटकांची ओळख :

**तुम्हांला कलेचे घटक माहीत आहेत का?**




**आकृती ७.१ कलेचे मूलभूत घटक**

१. **प्रकाश** :प्रकाश हा कलेचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि मूलभूत घटक आहे. तो कलेचा आणि डिझाइनचा बाह्य स्वरूपामधील घटक आहे.

**व्याख्या :**
प्रकाश हा असा घटक आहे की, जो प्रकाशित करतो आणि सर्व गोष्टी दृश्यमान करतो.

तो कलेचा घटक आहे तसेच तो आवश्यक घटक देखील आहे. प्रकाशाशिवाय कोणतीही कला डोळ्यांना दृश्यमान होत नाही आणि कोणतेही डिझाइन निर्माण करता येत नाही, त्याचा आनंद घेता येत नाही किंवा त्याचा उपयोग करता येत नाही. प्रकाशाशिवाय सौंदर्याची अभिव्यक्ती अपूर्ण असते.

**तुम्हांला आठवते का?**

प्रकाश नैसर्गिक किंवा कृत्रिम असतो. कार्यात्मकता आणि डिझाइन या दोन्ही दृष्टिकोनातून नैसर्गिक आणि कृत्रिम असे दोन्ही प्रकार घराच्या सजावटीसाठी महत्त्वाचे आहेत.

**अ. नैसर्गिक प्रकाश** : आपण सर्व या संज्ञेशी परिचित आहोत. ही सूर्याची दृश्यमान ऊर्जा आहे जी आपल्यासाठी सर्व काही दृश्यमान करते. दिवसभरामध्ये सूर्य प्रकाशाचा रंग आणि तीव्रता यामध्ये भिन्नता आढळते आणि म्हणूनच तो मानवी मनावर विविध प्रकारचा मानसिक परिणाम निर्माण करतो. तेजस्वी सूर्यप्रकाश घराच्या तसेच

कोणत्याही व्यावसायिक कार्याच्या अंतर्गत सजावटीमध्ये उत्साह निर्माण करतो तर अपुरा सूर्यप्रकाश खिन्न आणि दु:खी वातावरण निर्माण करतो.

**ब. कृत्रिम प्रकाश योजना :** कृत्रिम प्रकाश योजना अंतर्गत सजावटीमध्ये तितकीच महत्त्वाची आहे. ती रात्रीच्या वेळी अत्यावश्यक बनते आणि प्रकाशाची तीव्रता कमी झाल्यास दिवसादेखील आवश्यक ठरते. ही प्रकाश योजना पूर्णपणे नियंत्रित करता येते. तिच्या तीव्रतेमुळे क्रिया आणि सर्जनशीलता उत्तेजित होतात किंवा विश्रांतीचे वातावरण तयार करता येते. ही योजना अवकाशाचे स्वरूप बदलू शकते. मानवी हालचालींना दिशा देऊ शकते. योग्य वातावरणाची निर्मिती करू शकते आणि पोताचे सौंदर्य खुलवू शकते. सुयोग्य ठिकाणी प्राधान्य आणि लयीची निर्मिती करून गृह सजावटीमध्ये आस्था निर्माण करण्यास मदत करते.



**आकृती ७.२ (अ) इंटिरिअरमध्ये नैसर्गिक प्रकाश**



**आकृती ७.२ (ब) इंटिरिअरमध्ये कृत्रिम प्रकाश**

**२. रेषा :** सर्जनशील डिझाइन मधील रेषा हा मूलभूत घटक आहे. गृह सजावटीमध्ये रेषा महत्त्वाच्या असतात कारण त्या, खोलीला वैशिष्ट्य प्राप्त करून देतात तसेच मानवी मनावर विविध मानसिक परिणाम घडवून आणतात. प्रत्येक रेषा पाहणाऱ्या व्यक्तीपर्यंत काही विशिष्ट भाव पोहोचवतात.

**व्याख्या :**

- रेषा म्हणजे बिंदू किंवा ठिपके यांना एकत्र जोडून तयार केलेली साखळी होय.
- अवकाशामध्ये असलेल्या दोन बिंदूंची जोडणी म्हणजे रेषा होय.

**रेषांची वैशिष्ट्ये :** प्रत्येक रेषेची वैशिष्ट्यपूर्ण वैशिष्ट्ये असतात ज्यामुळे ती कोणत्याही प्रकारच्या डिझाइनमध्ये अद्वितीय आणि महत्त्वपूर्ण बनते.


- रेषा सरळ किंवा वक्राकार असतात. त्यांना लांबी हे एकच परिमाण असते आणि रुंदी हे परिमाण नसते.
- रेषा अष्टपैलू आहे आणि ती आकार परिभाषित किंवा मर्यादित करू शकते, क्षेत्र विभाजित करू शकते, हालचाल, वेग किंवा दिशा सूचित करू शकते.
- प्रत्येक रेषेला दिशा असते आडवी, उभी किंवा तिरपी. प्रत्येक दिशेचा, पाहणाऱ्या व्यक्तीच्या मनावर वेगळा परिणाम होतो.
- रेषा काही प्रमाणात विशिष्ट भावना दर्शवू शकतात. त्या निसर्गामधील विविध आकार आणि रूप तसेच मानवी शरीराकृती यांच्याशी ताळमेळ घालून विशिष्ट अर्थ आणि अभिव्यक्ती दर्शवतात.

**चर्चा करू :**

**रेषांचे मानसिक परिणाम :** वेगवेगळ्या प्रकारच्या रेषांचा संबंध मानवी शरीराच्या वेगवेगळ्या स्थितीशी तसेच निसर्गामधल्या वेगवेगळ्या रूपांशी जोडला जातो. अशा प्रकारे संबंध जोडला जाऊन त्या विशिष्ट अर्थ आणि अभिव्यक्ती सुचवतात आणि मानवी मनावर भावनिक परिणाम घडवून आणतात.

**अ. उभ्या रेषा :** कार्यरत असलेल्या उभ्या स्थितीमधील मानवी शरीराकृतीशी संबंध जोडला जाऊन या रेषा जिवंतपणा आणि क्रिया दर्शवतात. सरळपणा, प्रामाणिकपणा, मोठेपणा, इत्यादी भावना प्रतीत करतात. झाडे आणि

पर्वत आकाशाला गवसणी घालण्यासाठी झेपावतात म्हणून त्यांचा विचार पोहोचणे, चढणे, महत्त्वाकांक्षा असा केला जातो. उंच असलेल्या इमारती प्रबळ आणि शक्तिशाली वाटतात. घरामध्ये दरवाजे, पडदे यांच्यामधील उभ्या रेषा खोलीला आवश्यक ती ताकद आणि उंची प्रदान करतात. उभ्या रेषा उंची वाढल्याचा दृष्टी भ्रम निर्माण करतात.



**आकृती ७.३ (अ) उभ्या रेषा**




**आकृती ७.३ (ब) निसर्गामधील उभ्या रेषा**




**आकृती ७.३ (क) इमारतीमधील उभ्या रेषा**

**आकृती ७.३ उभ्या रेषा आणि त्यांचे सहसंबंध**

**ब. आडव्या रेषा :** आडवी रेषा मानवी शरीरामध्ये दिसून येते जेव्हा तो विश्रांती घेण्यासाठी किंवा झोपण्यासाठी आडवा होतो. प्रबळ आडव्या रेषा असलेले कोणतेही निसर्ग चित्र वातावरणामधील शांतता दर्शवते. अशा प्रकारे या रेषा स्थिरता, शांतता दर्शवतात. ही रेषा एखाद्या स्थिर जलाशयासारखी शांत आणि निष्क्रिय असते. घरांमध्ये या रेषा पुस्तकांची कपाटे, टेबल्स, इत्यादींमध्ये दिसून येतात. आडव्या रेषा रुंदी वाढल्याचा दृष्टी भ्रम निर्माण करतात.



**आकृती ७.४ (अ) आडव्या रेषा**



**आकृती ७.४ (ब) घरातील फर्निचर मधील आडव्या रेषा**




**आकृती ७.४ (क) मानवी शरीरामधील आडव्या रेषा**

**आकृती ७.४ आडव्या रेषा आणि त्यांचे सहसंबंध**

**क. तिरक्या किंवा तिरकस रेषा :** मानवी शरीर हालचाल करताना ही कोनाकृती स्थिती घेते. जोर लावताना, उदाहरणार्थ; एखादे जड फर्निचर ढकलताना मानवी शरीर तिरक्या स्थितीमध्ये असते. तसेच सायकल चालवताना किंवा वेगात चाललेल्या घोड्यावर बसलेले असताना मानवी शरीर तिरके असते. अशा प्रकारे, या रेषा हालचाल,

जोर, अस्वस्थता, क्रिया आणि उत्साह सुचवितात. या रेषा गतिमान असून हालचाल दर्शवतात जसे की वाऱ्याने होणारी पावसाची हालचाल. आर्किटेक्चर मध्ये घराचे छप्पर तिरक्या रेषेने दर्शवले जाते.



आकृती ७.५ (अ) तिरक्या रेषा




आकृती ७.५ (ब) मानवी शरीरामध्ये तिरक्या रेषा



आकृती ७.५ (क) निसर्गामध्ये तिरक्या रेषा

**आकृती ७.५ तिरक्या रेषा आणि त्यांचे सहसंबंध**

**ड. वक्राकार रेषा :** या रेषा आनंददायक आणि लवचिक दिसतात. मानवी शरीर नृत्य सादर करताना किंवा खेळताना अनेक वक्राकार स्थिती घेते. यामध्ये अनेक वेगवेगळी रूपे घेतली जातात. जसे – अर्धवर्तुळाकार, आवर्त, लयदार, वक्राकार रेषा, इत्यादी. या रेषेच्या दिशेच्या बदला मधील सुसंगत संक्रमणामुळे तिच्यामध्ये हळुवार वाहते सातत्य असते. तिची सावकाश होणारी हालचाल निष्क्रिय, स्त्रीलिंगी आणि हळुवार असते. या रेषा तारुण्याने भरलेल्या आणि आनंदी असतात. घरामध्ये या रेषा, पडदे आणि फर्निचर यामध्ये आपल्याला दिसून येतात. लयदार रेषा एखाद्या तलावामधील लहरींसारखी हळुवार गती दर्शवतात.



आकृती ७.६ (अ) वक्राकार रेषा



आकृती ७.६ (ब) मानवी शरीरामध्ये वक्राकार रेषा



आकृती ७.६ (क) पडद्यामध्ये वक्राकार रेषा

**आकृती ७.६ वक्राकार रेषा आणि त्यांचे सहसंबंध**

**३. अवकाश :** हा कलेचा एक महत्त्वाचा घटक आहे. अंतर्गत सजावटी मध्ये भिंती आणि जमीन खोलीचे रूप तयार करतात आणि त्यामध्ये अवकाश बंदिस्त करतात.

विविध क्रिया पार पाडण्यासाठी हा अवकाश वापरला जातो.

**व्याख्या : अवकाशाची व्याख्या शून्यता, रिकामेपण किंवा अंतर अशी केली जाते.**

अवकाशाचे महत्त्व समजणे सोपे आहे कारण कोणत्याही मानवी क्रियेसाठी अवकाश, हालचाल करणे आणि अनुभव घेणे शक्य करतो. एखाद्या वस्तूचा उपयोग करण्यामध्ये तो महत्त्वाची भूमिका बजावतो.

**तुम्ही सांगू शकाल का ?**

**अवकाशाचे महत्त्व:**

- अवकाशाचे महत्त्व लक्षात येणे सोपे आहे कारण प्रत्येक मानवी क्रियेसाठी अवकाश अत्यावश्यक असतो. अवकाश, हालचाल करणे आणि अनुभव घेणे शक्य करतो.
- एखाद्या भांड्यामध्ये बंदिस्त केलेला अवकाश त्याची क्षमता आणि वापर करण्याचे स्वरूप ठरवतो.
- सुईच्या अग्रस्थानी असलेले छिद्र तिच्या उपयोगासाठी तिला योग्य ठरवते.
- कपाटाच्या आत बंदिस्त केलेला अवकाश त्याला कपड्यांची साठवणूक करण्यासाठी सुयोग्य ठरवतो.
- अशाच प्रकारे कपामध्ये किती चहा किंवा कॉफी घालता येईल, पुष्पपात्रामध्ये किती मोठी पुष्परचना करता येईल असे मुद्दे त्यांच्या आत बंदिस्त असलेल्या अवकाशाशी संबंधित असतात.



**आकृती ७.७ (अ) कपामधील कार्यात्मक अवकाश**



**आकृती ७.७ (ब) कपाटामधील कार्यात्मक अवकाश**



**आकृती ७.७ (क) सुईमधील कार्यात्मक अवकाश**

अवकाश हा अंतर्गत सजावटीमधील महत्त्वाचा घटक आहे. अंतर्गत सजावटीमध्ये डिझायनर ज्या पद्धतीने कलेचे घटक वापरतो त्यावरून खोलीच्या अंतर्गत सजावटीमध्ये कसे वातावरण निर्माण होईल ते ठरवले जाते. जसे की उत्साहाचे किंवा उदास, गोंगाट करणारे आणि वादळी किंवा शांत. आजच्या शहरी भागांमध्ये अवकाश/जागा हा घटक खूप महाग आहे. पूर्वीच्या घरांच्या तुलनेमध्ये आजची घरे खूप लहान आहेत. कलेच्या घटकांचा यशस्वी उपयोग कार्यास उपयुक्त तसेच सौंदर्यपूर्ण इंटिरिअर निर्माण करण्यास मदत करतो. रंग, पोत, पॅटर्न आणि प्रकाश अशा घटकांच्या यशस्वी उपयोगामुळे ते शक्य होते.

### ४. रूप (फॉर्म) आणि आकार :


जेव्हा विविध दिशांनी जाणाऱ्या रेषा एकमेकांना छेदून जातात तेव्हा विविध आकारांची निर्मिती केली जाते.

**व्याख्या :**

- **आकार हा अवकाशाची व्याप्ती दर्शवणारा घटक होय.**
- **रूप (फॉर्म) ची व्याख्या त्रिमित आकार अशी केली जाते.**

रूप आणि आकार यांचा परस्पर संबंध आहे. आकार हे अवकाश बंदिस्त करणारे सपाट घटक असतात आणि रूप मध्ये घनता समाविष्ट केलेली असते. फॉर्म ठोस आणि मूर्त आहे. आकार आणि रूप आपल्याला वस्तूच्या आकारमानाचा अंदाज येण्यास उपयुक्त ठरतात.

रूप हा गृह सजावटीमधील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. रूपाच्या सौंदर्याशिवाय सर्वोत्तम रंग, पोत आणि पॅटर्न यांचा लाभ घेता येणार नाही. रूप मधील विविधता इंटिरिअरमध्ये आस्था निर्माण करण्यास मदत करतात. उदाहरणार्थ, आयताकृती सोफा, दिव्याचा गोलाकार बेस, वक्राकार गादीचे फर्निचर, उशा आणि फ्रेम्स हे सर्व खोलीमध्ये आकारांची विविधता दर्शवतात.




**आकृती ७.८ (अ) रूप आणि अवकाश**



**आकृती ७.८ (ब) इंटिरिअर मधील रूप (फॉर्म)ची विविधता**

**५. पोत** : प्रत्येक वस्तूला, ती नैसर्गिक असो किंवा कृत्रिम तिचे स्वतःचे पोत असते. याचाच अर्थ प्रत्येक वस्तूचे स्वतःचे मूळ पोत असते म्हणजेच आपण आपल्या आजूबाजूला असलेल्या विविध पोतांच्या संपर्कात येतो.

**व्याख्या : पोत म्हणजे वस्तूचा किंवा वस्तूच्या पृष्ठभागाचा दर्जा. वस्तूच्या पृष्ठभागाला स्पर्श करून किंवा तिच्याकडे दृष्टिक्षेप टाकून तो समजतो.**

**पोताचे प्रकार :**

**अ. स्पर्श जन्य पोत** : वस्तूच्या पृष्ठभागावरून हात फिरवून जे पोत समजते त्याला स्पर्शजन्य पोत असे म्हणतात. उदाहरणार्थ; खरखरीत, गुळगुळीत, मऊ, कठीण, इत्यादी.

**ब. दृक् पोत** : जे पोत वस्तूकडे पाहून समजते त्यास दृक्-पोत असे म्हणतात.

**माहिती करून घ्या :**

पोत मानवी जीवनामध्ये महत्त्वाची असतात तसेच ती इंटिरिअर डिझाइनमध्ये देखील महत्त्वाची असतात. पोत, साहित्य आणि वस्तूंना वैशिष्ट्ये आणि रूची प्रदान करतात.

- त्यांचा शरीरावर परिणाम होतो उदाहरणार्थ; खरखरीत पोताचे फर्निचरचे साहित्य आपल्याला त्रासदायक होते आणि अस्वस्थ करते.
- पोत, प्रकाश परावर्तनावर परिणाम करते आणि त्यामुळे रंगावर परिणाम होतो.
  - चकचकीत आणि गुळगुळीत पृष्ठभाग जास्त प्रमाणात प्रकाश परावर्तित करतात ज्यामुळे रंग अधिक तीव्र आणि तेजस्वी वाटतात आणि चकाकी (ग्लेअर) निर्माण करतात.
  - खरखरीत पृष्ठभाग कमी प्रमाणात प्रकाश परावर्तित करतात जामुळे रंग अधिक गडद वाटतात परिणामतः इंटिरिअर गडद आणि उदास वाटतात.
- त्यांचा इंटिरीअरची निगा राखण्यावर परिणाम होतो.
  - चकचकीत आणि गुळगुळीत पृष्ठभाग जास्त प्रमाणात प्रकाश परावर्तित करतात त्यामुळे त्यांच्यात असलेली धूळ दिसून येते आणि ते स्वच्छ करणे आवश्यक ठरते. परंतु ते सहजतेने स्वच्छ करता येतात.
  - पोत खरखरीत असेल तर धूळ पटकन दाखवली जात नाही. परंतु त्यांच्या स्वच्छतेला वेळ लागतो.



आकृती ७.९ (अ) मऊ पोताचा गालिचा



आकृती ७.९ (ब) खरखरीत पोताचा गालिचा

आकृती ७.९ इंटिरिअर डिझाइनमधील पोत

### ६. पॅटर्न :

गृह सजावटीमध्ये विचारात घ्यावा लागणारा पॅटर्न हा एक महत्त्वाचा घटक आहे.

**व्याख्या :**

**पॅटर्नचा अर्थ कोणत्याही पृष्ठभागावर केलेली समृद्धी असा दिला जातो म्हणूनच पॅटर्नची व्याख्या पृष्ठभागाची कोणतीही समृद्धी अशी केली जाते.**

पॅटर्नचा उपयोग केल्यामुळे एखाद्या खोलीमध्ये जिवंतपणा आणण्यास आणि आस्था निर्माण करण्यास मदत होते. परंतु जर त्याचा उपयोग जास्त प्रमाणात केला तर त्यामुळे खोलीमध्ये अस्वस्थता आणि अनावश्यक जास्त प्रमाणात उत्साह निर्माण केला जाईल. खोलीमध्ये किती प्रमाणात पॅटर्न असावा यावर मतभिन्नता आहे परंतु सर्वसाधारणपणे, खोलीच्या संपूर्ण आकारमानाच्या एक चतुर्थांश भागावर पॅटर्नचा उपयोग करण्याचा प्रघात आहे. लहान खोली पेक्षा मोठ्या खोलीमध्ये जास्त प्रमाणात पॅटर्न योग्य वाटतो.

**लक्षात ठेवा :**

पॅटर्नचे चार प्रकार आहेत, नैसर्गिक, अलंकारिक, भौमितिक आणि केवल.

**अ. नैसर्गिक घटक :** हे पॅटर्न हुबेहूब निसर्गामधील आकारांप्रमाणे दिसतात. ते फुले, प्राणी आणि निसर्ग दृश्यांसारखे दिसतात.

**ब. अलंकारिक घटक :** हे पॅटर्न नैसर्गिक आकारांवर आधारित असतात परंतु रेषा साध्या केलेल्या असतात आणि सजावटीसाठी काही काल्पनिक आकार वापरले जातात.

**क. भौमितिक घटक :** हे पॅटर्न भौमितिक आकारांवर आधारित असतात. जसे की वर्तुळ, आयत आणि त्रिकोण आणि त्यामधील विविधता.

**ड. केवल घटक :** हे पॅटर्न म्हणजे कलाकाराचे स्वत:चे नैसर्गिक आकारांचे प्रतिनिधित्व होय. तो आपली कल्पनाशक्ती वापरून वेगवेगळे आकार दाखवतो. हे पॅटर्न माहीत असलेला कोणताही आकार दाखवत नाहीत आणि ते समजायला कठीण असतात.




आकृती ७.१० (अ) नैसर्गिक पॅटर्न



आकृती ७.१० (ब) अलंकारिक पॅटर्न



आकृती ७.१० (क) भौमितिक पॅटर्न



आकृती ७.१० (ड) केवल पॅटर्न

आकृती ७.१० पॅटर्नचे प्रकार

**७. रंग** : रंगाचा लोकांच्या भावनांवर खूप मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो आणि म्हणूनच वातावरणाच्या निर्मितीसाठी ते जबाबदार ठरतात. विविध रंग विविध भावनिक परिणाम घडवून आणतात. काही रंग संगतीच्या बाबतीत काही लोक खूप संवेदनशील असतात आणि ते इतर लोकांपेक्षा जास्त प्रमाणात उत्तेजित होतात. अशा प्रकारे, गृह सजावटीमध्ये रंगांची निवड काळजीपूर्वक करणे आवश्यक ठरते.

**व्याख्या : रंग म्हणजे मानवी डोळ्यांमध्ये एखाद्या वस्तूपासून प्रतिबिंबित होणाऱ्या प्रकाशाची गुणवत्ता.**

रंग ही डोळ्यांतील रेटिनाच्या विशिष्ट उत्तेजनामुळे मनामध्ये निर्माण झालेली भावना होय. जेव्हा प्रकाश एखाद्या वस्तूवर पडतो तेव्हा त्यामधील काही प्रकाश वस्तूमध्ये शोषला जातो आणि उर्वरित परावर्तित केला जातो. वस्तूचा आपल्याला दिसणारा रंग हा त्या वस्तूने प्रकाशामधील कोणत्या रंग लहरी परावर्तित केल्या आहेत त्यावर अवलंबून असतो. उदाहरणार्थ; जर वस्तूचा रंग हिरवा दिसत असेल तर ती वस्तू पांढऱ्या प्रकाशामधील इतर सर्व रंग लहरी शोषून घेत असते आणि केवळ हिरव्या रंगाच्या लहरी परावर्तित करत असते. जी वस्तू पांढऱ्या रंगाची दिसते ती प्रकाशाच्या सर्व रंग लहरी परावर्तित करते आणि काळ्या रंगाची वस्तू प्रकाशाच्या सर्व रंग लहरी शोषून घेते आणि कोणत्याही परावर्तित करत नाही.

**खालील गोष्ट समजून घ्या :**

**रंगांची वैशिष्ट्ये किंवा गुणधर्म :**

**रंगांची तीन वैशिष्ट्ये आहेत.**

**अ. रंग नाम :** हे असे वैशिष्ट्य आहे की जे रंग ओळखण्यास मदत करते. सोप्या शब्दात **रंगाला दिलेले हे नाव असते** उदाहरणार्थ; तांबडा, निळा, नारिंगी ही सगळी रंग नामे आहेत. **हे वैशिष्ट्य रंगांचा उबदारपणा किंवा शीतलपणा दर्शवते.** उदाहरणार्थ; तांबडा हा उबदार रंग आहे, निळा हा शीतल रंग आहे आणि हिरवा हा मध्यम रंग आहे. एखाद्या रंगाचे रंग नाम जवळचा रंग मिसळून बदलता येते.

**ब. रंग मूल्य :** रंग मूल्य रंगाचा फिकेपणा किंवा गडदपणा दर्शवते. कोणत्याही रंगामध्ये पांढरा किंवा काळा रंग मिसळून त्याचे रंग मूल्य बदलता येते. जेव्हा एखाद्या रंगामध्ये कमी अधिक प्रमाणामध्ये पांढरा रंग मिसळला जातो तेव्हा अनेक उजळ छटा (टिंट्स) मिळतात आणि जेव्हा रंगामध्ये कमी अधिक प्रमाणामध्ये काळा रंग मिसळला जातो तेव्हा अनेक गडद छटा (शेड्स) मिळतात. पांढऱ्या रंगाचे मूल्य सर्वोच्च असते आणि काळ्या रंगाचे मूल्य सर्वांत कमी असते.


**क. रंगकांती :** रंगकांती याचा संबंध रंगाचा तीव्रपणा किंवा मंदपणा यांच्याशी असतो. रंगकांती, रंगाचे सामर्थ्य किंवा कमजोरी दर्शवते. रंगामध्ये जास्त प्रमाणात रंग मिसळून तो अधिक तीव्र बनवता येतो किंवा त्यामध्ये पाणी मिसळून किंवा राखाडी रंग मिसळून तो मंद करता येतो. उदाहरणार्थ; शुद्ध तांबडा रंग अधिक तीव्र असतो तर विटकरी तांबडा रंग कमी तीव्रतेचा असतो.

## नेहमी लक्षात ठेवा :

**रंग चक्र :**

स्पेक्ट्रममधील रंगांच्या रचनेप्रमाणे रंगांची वक्राकार रचना रंग चक्रामध्ये वर्तुळावर केलेली असते. प्रँग रंग चक्रामधील बारा रंगांचे विभाजन प्राथमिक, दुय्यम आणि माध्यमिक रंग असे केले आहे.


**अ. प्राथमिक रंग :** तांबडा, पिवळा आणि निळा हे तीन प्राथमिक रंग आहेत. त्यांना प्राथमिक रंग असे म्हटले जाते कारण ते इतर रंगांच्या मिश्रणाने तयार होत नाहीत. परंतु त्यांच्या मिश्रणाने इतर अनेक रंग तयार करता येतात.




आकृती ७.११ प्राथमिक रंग

**ब. दुय्यम रंग :** हिरवा, नारिंगी आणि जांभळा हे दुय्यम रंग आहेत. सम प्रमाणातील प्राथमिक रंगांपासून हे रंग तयार केले जातात.


- हिरवा = पिवळा + निळा
- नारिंगी = तांबडा + पिवळा
- जांभळा = तांबडा + निळा





आकृती ७.१२ दुय्यम रंग

**क. माध्यमिक रंग :** हे रंग प्रत्येक प्राथमिक आणि त्याच्या जवळील दुय्यम रंग यांच्या दरम्यान असतात. असे सहा माध्यमिक रंग आहेत. ज्यांची नावे – पिवळसर हिरवा, निळसर हिरवा, निळसर जांभळा, तांबूस जांभळा, तांबूस नारिंगी आणि पिवळसर नारिंगी अशी आहेत.

- पिवळसर हिरवा = पिवळा + हिरवा
- निळसर हिरवा = निळा + हिरवा
- निळसर जांभळा = निळा + जांभळा
- तांबूस जांभळा = तांबडा + जांभळा
- तांबूस नारिंगी = तांबडा + नारिंगी
- पिवळसर नारिंगी = पिवळा + नारिंगी




आकृती ७.१३ माध्यमिक रंग




आकृती ७.१४ रंग चक्र

### आंतरजाल माझा मित्र :

१. आंतरजालावर कलेचे विविध घटक शोधा आणि त्यांच्या विविध चित्रांचे निरीक्षण करा.


२. आंतरजालावर रंग चक्र आणि रंग संगती शोधा.


३. रंगाचे मानवी मनावर होणारे परिणाम याची माहिती आंतरजालावर वाचा.

**रंगसंवाद :**

गृह सजावटीसाठी रंगांची निवड करताना अनेक वेळा असे दिसून येते की काही लोकांनी केलेले रंगांचे एकत्रीकरण रुचीपूर्ण वाटते. परंतु प्रत्येक व्यक्तीला अशी रंगांबद्दलची संवेदना नसते आणि अशा लोकांना रंगांची निवड करण्यासाठी रंगसंवाद मार्गदर्शन करतात. येथे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की रंग रंगसंवाद, रंगांची निवड करण्यासाठीचे नियम नसून ते फक्त मार्गदर्शन पुरवतात.

**रंगसंवादांचे वर्गीकरण**




**आकृती ७.१५ रंगसंवाद**

**सैद्धांतिकदृष्ट्या रंगसंवादांचे खालील प्रकार सांगितले जातात :**

१. **एक रंगसंवाद** : या रंग संवादामध्ये रंग चक्रावरील केवळ एकच रंग निवडला आणि वापरला जातो. उदाहरणार्थ; तांबडा, गुलाबी, मरून इत्यादी. हा रंगसंवाद निरस आणि कंटाळवाणा होऊ शकतो. आस्था निर्माण करण्यासाठी रंग मूल्य, रंग कांती आणि पोत यामध्ये बदल करावा.

२. **संबंधित रंगसंवाद** : हा रंगसंवाद रंग चक्रावर परस्परांच्या जवळ असलेले रंग वापरून केला जातो. उदाहरणार्थ; पिवळा, पिवळसर हिरवा, हिरवा, निळसर हिरवा. या रंगसंवादामध्ये रंगांची निवड काळजीपूर्वक करावी लागते अन्यथा रंगसंवाद खूप जास्त प्रमाणात शीतल किंवा खूप जास्त प्रमाणात उबदार होऊ शकतो.

३. **विरोधी रंगसंवाद** : रंग चक्रावर परस्परांच्या बरोबर समोर असलेल्या रंगांना विरोधी रंग असे म्हणतात. असे दोन रंग या रंगसंवादामध्ये वापरले जातात. उदाहरणार्थ; निळा आणि नारिंगी. असा रंगसंवाद सर्वसाधारणपणे खूप गतिमान आणि आस्था निर्माण करणारा असतो.

४. **दुहेरी विरोधी रंगसंवाद** : या रंगसंवादामध्ये रंग चक्रावर एकमेकांच्या जवळ असलेले दोन रंग आणि त्यांचे विरोधी रंग वापरले जातात. उदाहरणार्थ; पिवळा, पिवळसर हिरवा, जांभळा, तांबूस जांभळा.

५. **विभक्त विरोधी रंगसंवाद** : रंगचक्रावरील एका रंगाची निवड करून त्याबरोबर त्याच्या विरोधी रंगांच्या दोन्ही बाजूंना असणारे दोन रंग निवडून विभक्त विरोधी रंगसंवाद तयार केला जातो. उदाहरणार्थ; निळा, पिवळसर नारिंगी आणि तांबूस नारिंगी. हा देखील एक विरोधी रंगसंवादाचा प्रकार आहे.

६. **त्री रंगसंवाद** : रंगचक्रावर कोठेही असलेल्या समभुज त्रिकोणाच्या कोनबिंदूवर असलेले तीन रंग वापरून हा रंगसंवाद तयार केला जातो. उदाहरणार्थ; प्राथमिक रंगांचा त्री रंगसंवाद – पिवळा, तांबडा आणि निळा.

**तुमची बुद्धी वापरा :**

**लक्षात घ्या की प्रत्येक रंगसंवादासाठी एक उदाहरण दिले आहे. अशा प्रमाणे प्रत्येक रंगसंवादासाठी वेगळे एक उदाहरण शोधा आणि ते खाली दिलेल्या तक्त्यामध्ये लिहा.**

| अ.क्र. | रंगसंवादाचे नाव | उदाहरण |
|---|---|---|
| १. | एक रंग संवाद | |
| २. | संबंधित रंगसंवाद | |
| ३. | विरोधी रंगसंवाद | |
| ४. | दुहेरी विरोधी रंगसंवाद | |
| ५. | विभक्त विरोधी रंगसंवाद | |
| ६. | त्री रंगसंवाद | |

## ७.२ डिझाइनच्या तत्त्वांची ओळख :

डिझाइन तयार करण्यासाठी डिझाइनर कलेचे विविध घटक वापरतो. प्रकाश, रेषा, अवकाश, रूप आणि आकार, पोत, पॅटर्न आणि रंग या कलेच्या घटकांची निवड आणि रचना डिझायनरला त्याच्या किंवा तिच्या कल्पना व्यक्त करण्यासाठी मदत करतात. कलेच्या या घटकांबरोबरच डिझाइनची मूलभूत तत्त्वे सुसंगती (सुसंवाद), तोल, लय, प्राधान्य आणि प्रमाण यांचाही उपयोग डिझायनर डिझाइनच्या निर्मितीमध्ये करतो आणि त्याची/तिची उद्‌दिष्टे साध्य करतो. चांगली डिझाइन्स निर्माण करण्याच्या प्रक्रियेमध्ये डिझाइनची तत्त्वे मार्गदर्शक ठरतात.




**आकृती ७.१६ डिझाइनची तत्त्वे**

गृह सजावटीमध्ये (घराच्या डिझाइन) मध्ये, सौंदर्यपूर्ण आणि कार्यासाठी उपयुक्त असे भाग तयार करण्यासाठी व्यक्तीने कलेचे घटक आणि डिझाइनची तत्त्वे यांची मदत घ्यावी. अंतर्गत सजावटीमधील सौंदर्याची वृद्‌धी करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. हे उद्‌दिष्ट साध्य करण्यासाठी व्यक्तीकडे कलेचे घटक आणि डिझाइनची तत्त्वे यांना हाताळण्याचे ज्ञान असले पाहिजे.

**सर्व तत्त्वांची आपण चर्चा करू :**


**१. सुसंगती :**

सोप्या शब्दामध्ये सुसंगती म्हणजे एकता. याचा अर्थ एकत्रितपणे वापरलेल्या कलेच्या घटकांच्या दृश्य स्वरूपामध्ये किंवा वैशिष्ट्यांमध्ये समानता असणे.

**व्याख्या :**

**सुसंगती हे असे तत्त्व आहे की जे साधर्म्य असलेल्या वस्तू आणि कल्पना यांच्या निवडीमधून आणि रचनेमधून एकतेची भावना निर्माण करते.**

एकसमान रेषा, आकार, आकारमान, पोत आणि रंग यांच्या निवडीमधून सुसंगती साध्य करता येते. उदाहरणार्थ, आयताकृती वस्तूच्या सजावटीसाठी व्यक्तीने उभ्या आणि आडव्या रेषा वापराव्या तर गोलाकृती वस्तूसाठी वक्राकार रेषा सुसंगत ठरतात.



खूप जास्त प्रमाणात समानता असल्यास निरसता निर्माण होईल. अशी निरसता टाळण्यासाठी काही प्रमाणामध्ये विविधता आवश्यक असते जी आकार, आकारमान, पोत, कल्पना आणि रंग यांच्यामधील विविधतेमधून साध्य करता येते. आस्था निर्माण करण्यासाठी चांगल्या डिझाइनमध्ये एकता आणि विविधता ही दोन्हीही तत्त्वे एकत्रितपणे वापरली गेली पाहिजेत.

गृह सजावटीमध्ये, फर्निचरच्या मांडणीमध्ये आकाराची सुसंगती विचारात घेतली पाहिजे. मोठ्या आकाराच्या वस्तू खोलीच्या सीमारेषांना अनुसरून ठेवाव्या आणि केवळ लहान वस्तू वेगळ्या स्थितीमध्ये ठेवाव्या. विविधता आणण्यासाठी काही लहान वस्तू किंचित कोनाकृती पद्‌धतीने (थोड्या तिरक्या) ठेवता येतील.

खाली दिलेले पहिले चित्र बैठकीच्या खोलीचे आहे. जिथे सोफा भिंतीच्या लांबीला समांतर असा ठेवला आहे आणि सोफ्याची खुर्ची विविधता आणण्यासाठी थोडी तिरकी ठेवली आहे. दुसऱ्या चित्रामध्ये भिंतीवर कार्टूनची चित्रे लावली आहेत जी लहान मुलांच्या खोलीमध्ये सुसंगती निर्माण करतात.



**आकृती ७.१८ (अ) फर्निचरच्या मांडणीमध्ये आकाराची सुसंगती**



**आकृती ७.१८ (ब) मुलांच्या खोलीमध्ये सुसंगती**

**आकृती ७.१८ अंतर्गत सजावटीमध्ये सुसंगती**

**२. तोल :**

हे कलेचे एक तत्व आहे जे दृक्-कलेमध्ये तसेच गृहसजावटीच्या सर्व क्षेत्रात आकर्षक दृश्य प्रभाव निर्माण करण्यास मदत करते.

**व्याख्या :**


- तोलाची व्याख्या विश्रांती किंवा आराम अशी केली जाते.
- तोल साधण्यासाठी एखाद्या अक्षाभोवती आकार आणि रंग यांची मांडणी केंद्राभोवती सर्व बाजूंना समान वजन असेल अशा प्रकारे केली जाते.

तोलाचे तीन प्रकार आहेत - समतोल, असमतोल आणि मध्यवर्ती तोल.

**अ.समतोल :** या तोलाला औपचारिक तोल असे देखील म्हणले जाते. अक्षापासून समान अंतरावर एकसारख्या वस्तूंची किंवा समान दृक् वजन असणाऱ्या वस्तूंची मांडणी करून हा तोल साधला जातो. हा तोल औपचारिक वातावरणाची निर्मिती करतो, विशेषतः अशा ठिकाणी की जेथे असे औपचारिक वातावरण आवश्यक असते. उदाहरणार्थ; कार्यालये, जेथे अनेक वेगवेगळ्या औपचारिक मिटिंग्ज घेतल्या जातात. हा तोल शांत आणि प्रतिष्ठित आहे. यामध्ये विविधतेची कमतरता असते आणि तो निरस होऊ शकतो.

**ब. असमतोल किंवा अनौपचारिक तोल :** या तोलाला अनौपचारिक तोल असेही म्हणतात. जेव्हा सम प्रमाणात लक्ष वेधून न घेणाऱ्या वस्तूंची मांडणी केंद्रापासून वेगवेगळ्या अंतरावर केली जाते तेव्हा हा तोल निर्माण होतो. तो अनौपचारिक वातावरण निर्माण करतो आणि रचनेमध्ये विविधता आणण्याची मोठ्या प्रमाणात संधी देतो.

**क.मध्यवर्ती तोल :** जेव्हा सर्व भाग किंवा घटक मध्यापासून निघून परीघाकडे नेले जातात तेव्हा निर्माण होणाऱ्या तोलाला मध्यवर्ती तोल असे म्हणतात.



**आकृती ७.१९ समतोल आणि असमतोल**

गृह सजावटीमध्ये तोल महत्त्वाची भूमिका पार पाडतो, जेथे पाहणाऱ्या व्यक्तीचे लक्ष काल्पनिक अक्षाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या दृक् वजनाकडे समान प्रमाणात वेधले गेले पाहिजे. मानवी मनावर मोठा मानसिक परिणाम करू शकणारे तीव्र रंग, ठळक फॉर्म्स, मोठे पॅटर्न्स, प्रबळ विरोध यांचा उपयोग करून तोल साध्य करता येतो. गृह सजावटीमध्ये जवळपास सर्व ठिकाणी तोल वापरला जातो जसे फर्निचरची मांडणी, पुष्परचना, टेबलची मांडणी इत्यादी.

गृह सजावटीमध्ये, खोलीमध्ये फर्निचरची मांडणी करताना रुचीपूर्ण केन्द्र स्थानांमध्ये तोल साधण्याच्या दृष्टिकोनातून मोठे फर्निचर सर्व प्रथम मांडावे. सुयोग्य फर्निचर समूह निर्माण करण्याच्या तसेच तोल साधण्याच्या दृष्टिकोनातून लहान, हलवता येणारे फर्निचर नंतर मांडावे. फर्निचरची मांडणी करून झाल्यानंतर प्रत्येक समूहामध्ये तोल साधण्याकडे लक्ष वळविले जाईल. योग्य तोल असलेल्या भिंतीवर मध्यवर्ती रेषेच्या दोन्ही बाजूंना अंदाजे समान आकर्षणे असतील.



**आकृती ७.२० (अ) इंटिरिअरमध्ये औपचारिक तोल**



आकृती ७.२०(ब) रांगोळी डिझाइनमध्ये मध्यवर्ती तोल

आकृती ७.२० इंटिरिअर डिझाइनमध्ये तोल

**३. लय :**

डिझाइनमध्ये किंवा सजावटीमध्ये डोळ्यांची संघटित हालचाल निर्माण करण्यासाठी लय मदत करते.

**व्याख्या :**

- **डिझाइनमध्ये एक प्रकारची हालचाल म्हणजे लय अशी लयीची व्याख्या केली जाते. परंतु डिझाइनमधील सर्व प्रकारच्या हालचाली लयदार नसतात हे लक्षात ठेवले पाहिजे. रेषा, आकार, रंग इत्यादी घटकांच्या मांडणीमुळे डिझाइनमध्ये दृष्टीची हालचाल विशिष्ट दिशेने घडून येते आणि हालचालीस एक प्रकारची गती प्राप्त होते. अशा दृष्टीच्या हालचालीसाठी तयार झालेल्या सुसंगत, सुसंबद्ध मार्गाला लय असे म्हणतात. म्हणूनच लय ही हालचालीशी संबंधित आहे.**


**डोळ्यांची लयदार हालचाल खालील प्रकारे निर्माण करता येते (लयीचे प्रकार) :**

१. आकारांच्या पुनरावृत्तीमधून


२. आकारमानाच्या प्रागतिकवाढीमधून

३. मध्यापासून बाहेर पसरणाऱ्या (रेडिएटिंग) रेषांमधून


४. एकसंध रेषांमधून




आकृती ७.२१ (अ) आकारांची पुनरावृत्ती



आकृती ७.२१ (ब) आकारांची प्रागतिक वाढ



आकृती ७.२१ (क) रेडिएटिंग रेषा



आकृती ७.२१ (ड) एकसंध रेषा

**आकृती ७.२१ डिझाइनमध्ये लय निर्माण करण्याचे मार्ग**

गृह सजावटीमध्ये लय अनेक ठिकाणी दिसून येते जसे की पडद्यांच्या चुण्या, कृत्रिम प्रकाश योजनेच्या दिव्यांची रचना, रांगोळीचे डिझाइन, पुष्परचना, इत्यादी. तसेच वॉल पेपर्स, गालिचे यांच्यामध्ये देखील ती आढळते. ठळक, हलणाऱ्या आणि लयदार रेषा असलेला वॉल पेपर किंवा गालिचा यांचा नमुना पाहिला असता त्याच्या मोठ्या स्वरूपाची कल्पना करून तो चांगला दिसेल असे वाटते परंतु जेव्हा तो, संपूर्ण भिंत किंवा जमीन या ठिकाणी लावला जातो तेव्हा त्यामध्ये खूप जास्त प्रमाणात हालचाल दिसून येते आणि खोलीमधील वस्तूंवरील लक्ष विचलित केले जाईल. दुसऱ्या शब्दात, भिंती आणि जमीन हे साधे असावे किंवा त्यावर कमी डिझाइन असावे ज्यामुळे ते फर्निशिंग आणि फर्निचर साठी पार्श्वभूमी तयार करतील. एखाद्या व्यक्तीला, पडद्याचे कापड किंवा पोस्टर्स या सारख्या लहान क्षेत्रामध्ये लयदार हालचाल चांगली वाटते. खोलीमध्ये फर्निचर आणि इतर सजावटीच्या वस्तूंची मांडणी करताना त्यांची मांडणी अशा प्रकारे करावी की ज्यायोगे दृष्टी खोलीमधील सर्वांत आकर्षक ठिकाणाकडे नेली जाईल आणि जेथे ती काही काळ स्थिर होईल आणि नंतर हळुवारपणे इतर वस्तूंमधून फिरवली जाईल.



आकृती ७.२२ (अ) वॉल पेपरमध्ये लय



आकृती ७.२२ (ब) पुष्प रचनेमध्ये लय

**आकृती ७.२२ इंटिरिअर डिझाइनमध्ये लय**

**४. प्राधान्य** : सोप्या शब्दामध्ये प्राधान्य म्हणजे डिझाइन मधील एखाद्या घटकाला किंवा रचनेमधील एखाद्या वस्तूला महत्त्व देणे. डिझाइनमध्ये आकर्षक जागा किंवा केंद्रबिंदू निर्माण करण्यासाठी याची मदत होते. डिझाइनमधील किंवा रचनेमधील विशिष्ट घटकाला प्राधान्य देण्यासाठी इतर काही घटकांना गौणत्व कसे द्यावे ते समजणे गरजेचे आहे.

**व्याख्या :**
**प्राधान्य हे कलेचे असे तत्त्व आहे की ज्यायोगे दृष्टी सर्व प्रथम रचनेमधील सर्वांत महत्त्वाच्या गोष्टीकडे खेचली जाते आणि नंतर इतर प्रत्येक घटकाकडे त्यांचे महत्त्व किती आहे त्या क्रमाने वळवली जाते.**

**हे तत्त्व समजण्यासाठी व्यक्तीला खालील घटकांचे ज्ञान असावे :**

**अ. प्राधान्य कशाला द्यावे :** सजावटीच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये कोणते घटक महत्त्वाचे आहेत ते बदलते परंतु ज्या घटकाला सर्वांत कमी प्राधान्य दिले जाते तो मात्र सहसा बदलत नाही. तो घटक म्हणजे पार्श्वभूमी; ज्याच्यासमोर वस्तू किंवा घटक पहिले जातात. याचाच अर्थ पार्श्वभूमीला गौणत्व असावे आणि त्याच्या समोर वस्तू पाहिल्या जाव्यात जेणे करून त्या उठावदार दिसतील.

**ब. प्राधान्य कसे द्यावे :** प्राधान्य निर्माण करण्याचे अनेक मार्ग (पद्धती) आहेत :

- वस्तूंची योग्य मांडणी किंवा समूहाने मांडणी करून

- रंगांचा विरोध वापरून
- अलंकरणाचा उपयोग करून
- वस्तूच्या भोवती पार्श्वभूमी म्हणून मोकळी पुरेशी जागा ठेवून
- विरोध किंवा नावीन्यपूर्ण रेषा, आकार किंवा आकारमान वापरून

**क. प्राधान्य किती प्रमाणात द्यावे :** या प्रश्नाचे सर्वांत सोपे उत्तर म्हणजे 'कलाकृती साधी ठेवावी.' डिझाइन मध्ये खूप जास्त प्रमाणात सजावट नसावी.

**ड. प्राधान्य कोठे द्यावे :** जर एखादी वस्तू आडव्या प्रतलावर आणि सर्व बाजूंनी पाहायची असेल तर ती उपलब्ध अवकाशाच्या मध्यभागी ठेवावी आणि चारी बाजूंना समान समास ठेवावा. जर वस्तू उभ्या स्थितीमध्ये पहायची असेल तर खालचा समास सर्वात जास्त रुंद आणि इतर बाजूंना तो समान असावा. गृह सजावटीमध्ये हे लक्षात ठेवावे की किती प्रमाणात प्राधान्य सुयोग्य ठरेल हे प्रत्येक खोलीबरोबर आणि ती खोली वापरणाऱ्या लोकांबरोबर बदलते. खोलीमधील पॅटर्नचे प्रमाण मर्यादित ठेवावे असे मार्गदर्शन दिले जाते. म्हणून व्यक्तीने प्राधान्य कुठे सर्वात जास्त आनंददायक वाटेल ते ठरवावे आणि नंतर खोलीमधील इतर वस्तूंना गौणत्व द्यावे ज्यामुळे पॅटर्नचा आनंद घेता येईल. प्रत्येक खोलीमध्ये एक आकर्षण केंद्र असावे परंतु प्रत्येक भिंतीचा स्वतःचा असा एक केंद्रबिंदू असावा ज्यायोगे खोली कोणत्याही ठिकाणाहून दिसायला चांगली वाटेल.



**आकृती ७.२३ (अ) खोलीच्या सजावटीमध्ये प्राधान्य**



**आकृती ७.२३ (ब) खोलीच्या सजावटीमध्ये प्राधान्य**

**आकृती ७.२३ इंटिरिअर डिझाइनमध्ये प्राधान्य**

**५. प्रमाण :**

प्रमाण हे डिझाइनचे मूलभूत तत्त्व आहे. या तत्त्वाचे सर्व प्रकारच्या डिझाइन्समध्ये उपयोजन आढळून येते, जसे की ड्रेस डिझाइन, इंटिरिअर डिझाइन किंवा इतर कोणतेही डिझाइन.


**व्याख्या :**

प्रमाणाच्या तत्त्वाला संबंधांमधील नियम असे संबोधले जाते.

हा नियम असे सांगतो की वस्तूच्या विविध भागांमधील संबंध, समूहामधील वस्तूंमधील संबंध सुयोग्य असावेत तसेच त्यांचे संपूर्ण क्षेत्राबरोबरील संबंध सुखद आणि सुयोग्य असावेत. उदाहरणार्थ, फर्निचरच्या विविध भागांचे एकमेकांमधील संबंध सुयोग्य असावेत, फर्निचरचे आकारमान समूहामधील इतर फर्निचर बरोबर सुयोग्य असावे आणि संपूर्ण समूहाचे आकारमान खोलीच्या आकारमानाबरोबर सुयोग्य असावे. प्रमाणासाठी ग्रीक लोकांनी तयार केलेला चौरस प्रमाणभूत आहे. त्याला **सुवर्णलंब चौकोन** असा देखील संबोधले जाते. हा चौकोन २:३ किंवा ३:५ असे प्रमाण वापरतो जे कोणत्याही भागाच्या अवकाशाचे विभाजन किंवा रचना, वस्तूंचे आकारमान किंवा सजावटीचे डिझाइन यांच्यासाठी उपयुक्त ठरतात.

ग्रीक चौकोनामध्ये लहान बाजूवर अंदाजे दोन भाग आणि लांब भागावर तसेच तीन भाग मोजले जातात. खूप लोकांना हा चौकोन समभुज चोकोनापेक्षा सुंदर वाटतो कारण समभुज चौकोनाच्या चारही बाजूंमध्ये खूप साम्य असते ज्यामुळे विविधता नसते. हा चौकोन, लांबलचक आयतापेक्षा सुंदर वाटतो कारण त्यामध्ये विविधता असते परंतु लांबी आणि रुंदी यांच्यामध्ये खूप

जास्त फरक असल्याने त्यांच्यामध्ये चांगले संबंध निर्माण होत नाहीत.




**आकृती ७.२४ चौकोन, निमुळता आयत आणि सुवर्णलंब चौकोन**

वरील आकृती मध्ये ‘अ’ सर्व बाजू सारख्या असलेला चौकोन दर्शवला आणि म्हणूनच त्यामध्ये विविधता नाही. आकृती ‘ब’ लंब आणि निमुळता आयत दर्शवते ज्यामध्ये विविधता आहे परंतु एकता नाही. आकृती ‘क’ मधील चौकोन प्रमाणाच्या सुवर्ण प्रमाणावर आधारित आहे जेथे लहान बाजूवर दोन सामान भाग आहेत आणि लांब बाजूवर तीन समान भाग आहेत. या चौकोनामध्ये एकता आणि विविधता दोन्हीही आहे. त्यामुळे या मधील प्रमाण आस्थापूर्ण वाटते.

कोणत्याही डिझाइनमध्ये जर प्रमाण अयोग्य वाटत असेल तर रेषांचा योग्य वापर प्रमाणांमध्ये बदल करण्यास सहाय्यभूत ठरते. असे नेहमी म्हटले जाते की, आडव्या रेषा रुंदी आणि उभ्या रेषा उंची प्रदान करतात.

इंटिरिअर डिझाइनमध्ये वस्तूंचे आकारमान बदलले आहे असे दाखवण्यासाठी रेषांचे हे वैशिष्ट्य खूप उपयुक्त ठरते. उदाहरणार्थ, ज्या खोलीची उंची कमी असेल त्या खोलीच्या वॉल पेपर्समध्ये उभ्या रेषा प्रतीत होतील असे डिझाइन असावे. उंचीला खूप कमी असलेल्या खिडक्यांना लांब पडदे असावे आणि आडवे पेल्मेट नसावे. कमी उंची असलेल्या खुर्चीला उभ्या रेषा असलेले कव्हर असावे आणि रेषा अशा रीतीने वापरलेल्या असाव्यात की ज्यामुळे डोळ्यांची हालचाल वर खाली घडून येईल. फर्निचरची निवड आणि मांडणी करताना व्यक्तीला स्केलचे ज्ञान असावे. स्केल हा प्रमाणाचा महत्त्वाचा घटक आहे. जर खोली मोठी असेल तर त्या खोली मधील फर्निचर मोठे असू शकते आणि लहान खोलीमध्ये लहान आकारमानाचे फर्निचर वापरावे.



**आकृती ७.२५ (अ) फर्निचरच्या मांडणीमध्ये प्रमाण**



**आकृती ७.२५ (ब) उभ्या रेषा असलेल्या वॉल पेपर**

**आकृती ७.२५ इंटिरिअर डिझाइनमध्ये प्रमाण**

## तुम्ही आठवू शकता का?

- प्रत्येक कुटुंबाची अशी इच्छा असते की त्यांचे घर छान सुशोभित केलेले आणि चांगले डिझाइन असलेले असावे.
- घरामध्ये सुंदर, प्रसन्न आणि कार्यात्मक जागा निर्माण करण्यासाठी कलेचे घटक आणि डिझाइनची तत्त्वे यांचे ज्ञान आवश्यक ते मार्गदर्शन पुरवते.
- प्रकाश, रेषा, अवकाश, रूप आणि आकार, पोत, पॅटर्न आणि रंग हे कलेचे मूलभूत घटक आहेत.
- प्रकाश हा असा घटक आहे की जो कोणत्याही डिझाइनची निर्मिती करणे आणि त्याचा आस्वाद घेणे शक्य करतो. प्रकाशाशिवाय सौंदर्याची अनुभूति घेणे अपूर्ण आहे.
- रेषा हा सर्जनशील रचनेमधील मूलभूत घटक आहे. रेषा खोलीला वैशिष्ट्य प्राप्त करून देतात तसेच मानवी मनावर विविध मानसिक परिणाम घडवून आणतात.
- अवकाश हा कलेचा महत्त्वाचा घटक आहे. कोणत्याही मानवी क्रियेसाठी अवकाश हालचाल करणे आणि अनुभव घेणे यासाठी सोय पुरवतो.
- रूप आणि आकार हे परस्पर संबंधित आहेत आकार हे अवकाश बंदिस्त करणारे सपाट घटक असतात आणि रूप मध्ये घनता समाविष्ट केलेली असते.
- प्रत्येक वस्तूला, ती नैसर्गिक असो किंवा कृत्रिम तिचे स्वतः चे पोत असते. पोताचे दोन प्रकार आहेत. स्पर्श जन्य पोत आणि दृक पोत.
- गृह सजावटीमध्ये पॅटर्न खोलीमध्ये जिवंतपणा आणि आस्था निर्माण करण्यास मदत करतो.
- रंग हा कलेचा महत्त्वाचा घटक आहे. रंगाचा लोकांच्या भावनांवर खूप मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो आणि म्हणूनच वातावरणाच्या निर्मितीसाठी ते जबाबदार ठरतात. यामुळेच रंगसंगतीची निवड काळजीपूर्वक करावी लागते.
- डिझाइनची निर्मिती करण्यासाठी डिझाइनर कलेच्या घटकांबरोबरच सुसंगती, तोल, लय, प्राधान्य आणि प्रमाण ही मूलभूत तत्त्वे देखील वापरतो.
- सोप्या शब्दामध्ये सुसंगती म्हणजे एकता. सुसंगती हे असे तत्त्व आहे की जे साधर्म्य असलेल्या वस्तू आणि कल्पना यांच्या निवडी मधून आणि रचने मधून एकतेची भावना निर्माण करते.
- तोलाची व्याख्या विश्रांती किंवा आराम अशी केली जाते. एखाद्या अक्षाभोवती आकार आणि रंग यांची मांडणी केंद्राभोवती सर्व बाजूंना समान वजन असेल अशा प्रकारे करून तोल साधला जातो.
- एक प्रकारची हालचाल म्हणजे लय अशी लयीची व्याख्या केली जाते. कलेमध्ये, लय म्हणजे डिझाइन मधील रेषा, रूप किंवा रंग यांच्या कोणत्याही मांडणीमधील सुसंगत मार्गावरून डोळ्यांची हालचाल घडून येणे.
- प्राधान्य हे कलेचे असे तत्त्व आहे की ज्यायोगे दृष्टी सर्व प्रथम रचनेमधील सर्वांत महत्त्वाच्या गोष्टीकडे खेचली जाते आणि नंतर इतर प्रत्येक घटकाकडे त्यांचे महत्त्व किती आहे त्या क्रमाने वळवली जाते.
- प्रमाण हे डिझाइनचे मूलभूत तत्त्व आहे. प्रमाणाच्या तत्त्वाला संबंधांमधील नियम असे संबोधले जाते.

## स्वाध्याय

- **वस्तुनिष्ठ प्रश्न :**

**१) बहूपर्यायी प्रश्न :**

१. दिवसभरामध्ये नैसर्गिक प्रकाशामधील रंग आणि .......... यांच्यामध्ये बदल घडून येतो.

| | |
|---|---|
| अ) तीव्रता | ब) गडदपणा |
| क) रंग मूल्य | ड) फिकेपणा |

२. जिवंतपणा आणि क्रिया या भावना ............ रेषांमधून दर्शविल्या जातात.

| | |
|---|---|
| अ) आडव्या | ब) उभ्या |
| क) वक्राकार | ड) तिरप्या |

३. हालचाल आणि अस्वस्थपणा या भावना .......... रेषांमधून दर्शविल्या जातात.

| | |
|---|---|
| अ) उभ्या | ब) वक्राकार |
| क) तिरप्या | ड) आडव्या |

४. इंटिरिअर डिझाइन मध्ये भिंती आणि जमीन खोलीचे ........ तयार करतात आणि त्यामध्ये अवकाश बंदिस्त केले जाते.

अ) आकार ब) रूप

क) क्षेत्र ड) पोत

५. वस्तूला स्पर्श केल्यानंतर वस्तूचे जे पोत समजते त्याला ........... पोत असे म्हणतात.

अ) स्पर्शजन्य ब) दृक्

क) खरखरीत ड) गुळगुळीत

६. अवकाश बंदिस्त करणाऱ्या सपाट घटकांना ........... असे म्हटले जाते.

अ) आकार ब) रूप

क) क्षेत्र ड) घनता

७. फुले, फळे, इत्यादींची चित्रे ज्या पॅटर्नमध्ये वापरली जातात त्या पॅटर्नला ........... पॅटर्न असे म्हणतात.

अ) भौमितिक ब) अलंकारिक

क) नैसर्गिक ड) केवल

८. खालील रंगांपैकी ........... हा रंग दुय्यम रंग आहे.

अ) हिरवा ब) निळा

क) गुलाबी ड) पिवळा

९. दोन प्राथमिक रंग मिसळून तयार केल्या जाणाऱ्या रंगांना ........... रंग म्हणतात.

अ) माध्यमिक ब) शीतल

क) दुय्यम ड) उबदार

१०. केवळ एका रंगाचा उपयोग करणाऱ्या रंगसंगतीला ........... रंगसंगती असे म्हणतात.

अ) पूरक ब) एक रंगसंगती

क) संबंधित ड) त्रिमित

## २) योग्य जोड्या जुळवा :

| अ | ब |
|---|---|
| रूप | एकतेचा ठसा |
| पॅटर्न | एकसारख्या वस्तू |
| पूरक रंगसंगती | आकारांची पुनरावृत्ती |
| समतोल | पृष्ठ भागावरील अलंकरण |
| सुसंगती | पिवळा आणि जांभळा |
| लय | घनता |

## ३) खालील विधाने चूक आहेत की बरोबर ते ओळखा:

अ) रेषा मानवी मनावर परिणाम करत नाहीत.

ब) खोलीचे रूप अवकाश बंदिस्त करते.

क) पोत स्पर्श करून तसेच दृष्टिक्षेपाने समजते.

ड) अलंकारिक घटक निसर्गामधील रूपांसारखे दिसतात.

इ) माध्यमिक रंग, दोन प्राथमिक रंगांच्या मिश्रणातून तयार करतात.

फ) काळ्या रंगाची वस्तू प्रकाशामधील सर्व प्रकाश किरणे परावर्तित करते आणि कोणतीही किरणे शोषून घेत नाही.

ग) संबंधित रंगसंवादामध्ये रंगचक्रावरील परस्परांजवळील रंग वापरले जातात.

ह) सुसंगती हे असे तत्त्व आहे की जे साधर्म्य असलेल्या वस्तू आणि कल्पना यांच्या निवडीमधून आणि रचने मधून एकतेची भावना निर्माण करते.

ई) समतोलाची निर्मिती अक्षाच्या दोन्ही बाजूंना वेगवेगळ्या वस्तूंची मांडणी करून केली जाते.

ज) कलेमध्ये लयीचा संबंध डोळ्यांच्या हालचालीशी असतो.

क) कोणत्याही डिझाईनची निर्मिती करताना पार्श्वभूमी नेहमी कमीत कमी स्पष्ट ठेवली जाते.

ल) सुवर्णलंब चौकोनामध्ये ३.३ असे प्रमाण वापरले जाते.

- **लघुत्तरी प्रश्न :**

## १) खालील संज्ञांच्या व्याख्या लिहा :

अ) सुसंगती

ब) असमतोल

क) लय

ड) प्राधान्य

इ) प्रमाण

## २. फरक लिहा :

अ) नैसर्गिक आणि कृत्रिम प्रकाश योजना

ब) उभ्या आणि आडव्या रेषांचे भावनिक परिणाम

क) आकार आणि रूप

ड) स्पर्शजन्य आणि दृक् पोत

इ) समतोल आणि असमतोल

**३. खालील टिपा लिहा :**

अ) मानवी जीवनामधील पोताचे महत्त्व

ब) एकरंग संवाद आणि संबंधित रंग संवाद

क) विरोध आणि दुहेरी विरोधी रंग संवाद

ड) मध्यवर्ती तोल

**४. थोडक्यात उत्तरे लिहा :**

अ) कलेचा घटक म्हणून रेषांची विविध वैशिष्ट्ये कोणती?

ब) अवकाश म्हणजे काय? इंटिरिअर डिझाइन मध्ये त्याचे महत्त्व काय?

क) पॅटर्नचे विविध प्रकार स्पष्ट करा.

ड) रंगांची विविध गुणवैशिष्ट्ये कोणती?

इ) सुयोग्य उदाहरणे देऊन विभक्त विरोधी आणि त्रीरंग संवाद स्पष्ट करा.

- **दीर्घोत्तरी प्रश्न :**

अ) सुसंगती म्हणजे काय? त्याचा इंटिरिअर डेकोरेशन मधील उपयोग स्पष्ट करा.

ब) तोल हे तत्त्व इंटिरिअर डिझाइनमध्ये कसे उपयुक्त ठरते ते स्पष्ट करा.

क) लय ही संज्ञा स्पष्ट करा आणि इंटिरिअर डिझाइनमध्ये लय कशी उपयुक्त असते ते स्पष्ट करा.

ड) प्राधान्याचे विविध घटक कोणते? आकृत्या काढून स्पष्ट करा.

इ) प्राधान्य म्हणजे काय? इंटिरिअर डिझाइनमध्ये ते कसे उपयुक्त ठरते?

**प्रोजेक्ट/असाइनमेंट :**

१) विविध खोल्यांमधील फर्निचरची मांडणी दाखवणारी पाच चित्रे इंटरनेटवरून डाऊनलोड करा आणि कलेचे घटक आणि डिझाइनची तत्त्वे त्यामध्ये कशी वापरली गेली आहेत ते शोधा.

**प्रात्यक्षिक/संबंधित कृती :**

१) रंगचक्र तयार करा.

२) कोऱ्या कागदावर १० सेंटिमीटर गुणिले १० सेंटिमीटरचे दोन चौकोन काढून त्यामध्ये मुक्त हस्त चित्रे काढा आणि कोणत्याही दोन रंगसंगतीचा उपयोग करून ती रंगवा.